296

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १२/०३/२०२४

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०२४/ प्र.क्र.७५/आरक्षण-३, दिनांक ११ मार्च, २०२४.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना...

******

परिपत्रक -

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०२४/ प्र.क्र. ७५/आरक्षण-३,दिनांक ११ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३१११४४१५७९७०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन अधिसूचनेची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना ...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक - बीसीसी-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - ११ मार्च, २०२४

संदर्भ-

१) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी २०१२/प्र.क्र.१८२/विजाभज -१, दि.२५ मार्च, २०१३.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक: व्हीजेएनटी-२०१४/प्र.क्र.११८/व्हिजेएनटी-१, दि.३१ जुलै, २०१४
३) शासन निर्णय , विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. सीबीसी-१०/२००८/प्र.क्र. ६९७/ विजाभज दि. १६ डिसेंबर २०१७
४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधियमन क्रमांक १६)

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी विशेष अधिवेशन घेऊन महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ एकमताने संमत केला आहे. मा. राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सदर अधिनियम अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये तसेच राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

सन २०१८ चा एसईबीसी आरक्षण अधिनियम निरसित झाल्याने व सद्यःस्थितीत जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्राप्त होणेबाबत राज्यातील विविध स्तरावरून तसेच विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/ तहसिल कार्यालय यांच्याकडून एसईबीसी वर्गास लागू झालेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्याची विनंती शासनास करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी खालीलप्रमाणे सर्वकष सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक -

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या कलम १२ मध्ये जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीबाबत सविस्तर नमूद केलेले आहे. सबब, मराठा समाजास सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी,

Scanned with CamScanner

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ यांच्या तरतुदी आवश्यक फेरफारांसह लागू असतील.

२. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अंतर्गत मराठा समाजास जातीची प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मिळण्यास पुराव्या अभावी विलंब होतो किंवा जातीचे प्रमाणपत्र देणे किंवा नाकारणे याबाबत कोणताही निर्णय न घेता दिर्घकाळ प्रकरणे प्रलंबित राहतात. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जदाराच्या जातीबाबत परिपूर्ण अभ्यास करुन निर्णय घ्यावा व निर्णय घेण्यास टाळाटाळ होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अंतर्गत मराठा समाजास जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्राकरीता महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मध्ये विहित केलेल्या आवश्यक पुराव्यांसह अर्जदाराने यथास्थिती सक्षम प्राधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रांकरीता अर्जदाराने उपलब्ध कागदपत्रांसह अर्ज केल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांचा असल्याने सदर अर्ज संबंधित कार्यालयातील निम्नस्तरावरील कर्मचाऱ्यांकडून नाकारण्यात येऊ नये.

४. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या कलम ५ (२) मध्ये एसईबीसी वर्गाच्या आरक्षणाच्या प्रयोजनांसाठी "उन्नत व प्रगत"( नॉन क्रिमिलेअर) गटाचे तत्व लागू असेल असे नमूद आहे.

याबाबत शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. २५ मार्च, २०१३ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट याकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदानासाठी समग्र सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णय दि. १६ डिसेंबर, २०१७ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट याकरीता नॉन क्रिमिलेअर साठी उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्ष इतकी करण्यात आली आहे. याबाबतचे नियम एसईबीसी वर्गास (मराठा समाजास) लागू राहतील.

५. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गाच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदाच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठी अधिनियमातील अनुच्छेद ५ (२) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) (मराठा समाजास) वर्गाला राखीव जागाच्या प्रयोजनाकरीता आरक्षणाच्या प्रयोजनासाठी उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती,



Scanned with CamScanner

उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील फक्त अशा व्यक्तींनाच या अधिनियमाखालील आरक्षण उपलब्ध असेल.

६. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गाकरीता जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच याकरीता मानीव दिनांक हा इतर मागासवर्ग प्रवर्गाप्रमाणे असल्याने नॉन क्रिमिलेअर संदर्भातील कार्यपध्दती संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रक दि.२५ मार्च, २०१३ प्रमाणे लागू राहील. तसेच संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णय दि. १६ डिसेंबर, २०१७ अन्वये लागू करण्यात आलेली नॉन क्रिमिलेअरची आर्थिक मर्यादा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) (मराठा समाजास) वर्गासही लागू राहील. तसेच संदर्भाधीन क्र.२ अन्वये विहित केलेल्या जात प्रमाणपत्र व नॉनक्रिलेअर प्रमाणपत्रात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या असून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता प्रमाणपत्राचा नमूना सदर शासन परिपत्रका सोबतच्या परिशिष्ट (अ) प्रमाणे राहील.

७. सदर शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०३१११४४१५७९७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHALID BASHIR AHMED ARAB

Digitally signed by KHALID BASHIR AHMED ARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=17b1bdae334a3efab8fa330885658eb14b09969ecbab94b7f20dfd8f09f568b, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=07B8F5561DC2748763D4033D2E7A20C2FBDCE61F9601805A936FED7CA35E325D, cn=KHALID BASHIR AHMED ARAB
Date: 2024.03.11 14:51:31 +05'30'

(खालिद बी. अरब)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
२) खाजगी सचिव, मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मंत्रालय, मुंबई.
३) खाजगी सचिव, मा. मंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई.
४) खाजगी सचिव, मा. मंत्री (उद्योग), मंत्रालय, मुंबई.
५) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय, मुंबई.
६) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मंत्रालय, मुंबई.
७) विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
८) विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०) अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिय (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner

१६) सचिय, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१७) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.

१८) सचिव (सा. वि.स.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-

१९) सचिय, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

२०) महालेखापाल, महाराष्ट्र-१. मुंबई.

२१) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

२२) अधिदान व लेखा अधिकारी, मुबई

२३) मुख्य महानगर दंडाधिकारी,

२४) सर्व विभागीय आयुक्त.

२५) सर्व जिल्हाधिकारी,

२६) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,

२७) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,

२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई

२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.

३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.

३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,

३२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ औरंगाबाद,

३३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ औरंगाबादः

३४) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३५) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

३६) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३७) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३८) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

३९) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

४०) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,

४१) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,

४२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

४३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ४४) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी

४५) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती

४६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. ४७ निवड नस्ती, का-मावक



Scanned with CamScanner

शासन परिपत्रक क्रमांक - बीसीसी-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-३ चे सहपत्र

परिशिष्ट-अ

Form of Certificate to be issued to Socially and Educationally Backward Class persons belonging the State of Maharashtra.

| Documents verified:- | (1) -------------- | (2) ------------- | (3) -------------- | (4) -------------------- |
|---|---|---|---|---|

**CASTE CERTIFICATE (PART-A)**

This is to certify/that Shri/Shrimati/Kumari ------------------------- Son/Daughter of --------------- of Village/Town---------------in District/Division*--------------- of the State of Maharashtra belongs to the------------- Caste under the Government Resolution Social Justice & Special Assistance Department No. dated 15th July, 2014 as amended from time to time as a Socially and Educationally Backward Class.

2. Shri/Shrimati/Kumari-----------and/or his/her family ordinarily reside (s) in village/Town --------------of ------------district/division of the State of Maharashtra.

**NON-CREAMY LAYER CERTIFICATE (PART-B)**

This is to certify that Shri/Smt./Kum. ---------------does not belong to the persons/sections (Creamy-layer) mentioned in the Government of Maharashtra Gazette, Extra-Ordinary, Part VIII, dated 30th November, 2018, Maharashtra State Reservation (of seats for admission in educational institutions in the State and for appointments in the public services and posts under the State) for Socially and Educationally Backward Classes (SEBC) Act, 2018 and instructions and guidelines laid down in the Government Resolution Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department No.CBC-10/2001/Pra.Kra. 120/Mavak-5, dated 1 November, 2001, CBC-1094/Pra. Kra.86/Mavak-5, dated 16th June, 1994, CBC-1094/Pra.Kra.86/Mavak-5, dated 5th June, 1997 and Government Resolution No.CBC- 10/2001/Pra.Kra.111/Mavak-5, dated 29th May, 2003 and Government Resolution No.VJNT-2014/C.R.118/VJNT-1, dated 31 July, 2014.

This Certificate is valid for the period ---------------year from the date of issue.

Signature------------.
Designation-----------
(With Seal of the Office)

Place:-----------

Dated:-------------

Please delete the words which are not applicable

**Note:-** The term "ordinarily reside(s)" used here will have the same meaning as in Section 20 of the Representation of the Peoples Act, 1950.



Scanned with CamScanner